शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं ५३/२०१८

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेश मोहनराव जोरगेवाड | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. कोल्हापूर इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर<br>२. कोल्हापूर इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,गोकुळ शिरगाव, कोल्हापूर | } | वि.प. |

कोल्हापूर इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर येथील शिक्षक श्री. राजेश मोहनराव जोरगेवाड (गुडमलवार) यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२२/१२/२०१७ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

My appointment is permanent and I am working from 21 oct.2005. as a Assistant professor on this college. In feb 2015, due to termination of my appointment, I have filed a case in tribunal court pune. In may 2016, court given order to reinstate my service and I have Joined since our termination, I haven't received annual increments which is my basic right. From June 2012, my increased AGP was not given to me. I have qualified Ph.D. in 2016 and I don't get any increments for which I deserve.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

श्री. राजेश मोहन जोरगेवाड यांचे संबधी विद्यापीठ व कॉलेज ट्रॅब्युनल पुणे येथे अपिल नं.०३/२०१५ (एस) अपिल प्रलंबित असलेने प्राचार्यांचा अभिप्राय /निवेदन दिलेले नव्हते.

**समितीची निरिक्षणे :**

१. तक्रारदार यांनी तक्रार अर्जात महाविद्यालयाने त्यांची सेवासमाप्ती केल्यानंतर मे. विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्या निर्णयानुसार सन २०१६ मध्ये ते पुनश्चःसेवेमध्ये हजर झाले. सेवासमाप्तीच्या आदेशानंतर त्यांना तक्रार अर्ज तारखेपर्यंत वेतनवाढ दिली नाही. तसेच सन २०१२ पासून ते अर्हताधारक असूनही वाढीव वेतनाचा (एजीपी) चा लाभ दिलेला नाही अशी तसेच पीएच.डी.प्रोत्साहानात्मक देय असणा-या वेतनवाढी दिलेल्या नाहीत अशी तक्रार नमूद केली आहे.

या प्रकरणावरील सुनावणी दरम्यान संस्था व महाविद्यालयाने समितीसमोर दाखल केलेल्या दि.१५ मार्च, २०२० च्या लेखी म्हणण्यामध्ये तक्रारदार यांच्या वार्षीक वेतनवाढीसह पगाराची वेतननिश्चिती केली आहे. तसेच पगारवाढीचा फरक देण्याची तरतुद करीत असल्याचे नमुद केले आहे. तक्रारदार यांनी त्यांना देय असणा-या वार्षीक वेतनवाढी महाविद्यालयाने पगारात लागू केले असल्याचे मान्य केले आहे. तथापी त्याचा पुर्वलक्षी प्रभावाने फरक देण्यात आलेला नसल्याचे समितीसमोर तक्रारदार यांनी कथन केले. सबब तक्रारदार यांना देण्यात आलेल्या वेनवाढींची पुर्वलक्षी प्रभावाने होणारी फरकाची रक्कम मिळणे आवश्यक असलेचे समितीचे मत झाले.

२. तक्रारदार यांनी तक्रार अर्जात ते अर्हताधारक असून जानेवारी २०१२ पासून वाढीव वेतन (एजीपी) मिळालेला नसलेची तक्रार नमूद केली आहे. तसेच तक्रारदार यांनी या पृष्ठार्थ All India Council for Technical education यांची ०९ जून २०१६ ची अधिसूचना तसेच AICTE यांचे तज्ञ कमीटीनी घेतलेल्या Letter No. F.No.FD/PSSC/Clarif/2003/1 fn-10/09/2003 1.2 (Lecture Senior Scale) निर्णयाची प्रत जोडली आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाने १५ मार्च २०२० रोजीच्या समितीसमोरील सादर केलेल्या म्हणण्यामध्ये तंत्रशिक्षणच्या सेवाशर्थी All Indial Council for Techanical Education (AICTE) यांच्या वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नोटीफिकेशन मधील तरतूदीनूसार अंमलात येते. दि. २२/०१/२०१० च्या नोटीफिकेशननुसार (XVIII)u All advancements to higher grade pays in various cadres will be effected subject to completion of two AICTE

approved refresher programs of not less then two weeks duration each and two one week each TEQIP sponsored programs. त्याच प्रमाणे दि. ०८/११/२०१२ रोजीच्या नोटीफिकेशन अन्वये CONFERENCE/TRAINING COURSES AND SEMINAR/WORKSHOP PAPERS करणे आवश्यक आहे. व TEQIP चे दोन प्रत्येकी एक आवठवडयाचे कोर्सेस करणे आवश्यक होते. त्यांनी ते या सदर नियामानुसार सदर कोर्सेस पुर्ण न केल्याने एजीपी मध्ये वाढीस म्हणजे स्टेज सहा हजार (सध्या मिळत असलेले एजीपी) च्या पुढील वाढीस तक्रारदार पात्र नाहीत असे म्हटले आहे.

दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेता समितीचे मत असे की, शिक्षकांचे कॅस अंतर्गत प्रमोशन त्यांच्या स्टेजनूसार निश्चित केले जाते. स्थाननिश्चितीबाबतची कार्यवाही कॅस समितीकडून केली जाते. सबब कॅस बाबतची कार्यवाही विचारात घेता, कॅस करिता योग्य ती कार्यवाही संस्थेने सत्वर करणे आवश्यक असलेचे समितीचे मत आहे.

३. तक्रारदार यांनी तक्रारअर्जात पीएच.डी प्रोत्साहनपर देय असणा-या वेतनवाढी मिळाव्या अशी मागणी केली आहे. याबाबत त्यांनी AICTE च्या ०१ मार्च २०१९ रोजीच्या अधिसूचनेमधील २.२२ (३) नुसार आपणास पीएच.डी.प्रोत्साहनपर वेतनवाढ मिळावी अशी मागणी केली आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाने दि. १५ मार्च २०२० रोजीच्या समितीसमोरील सादर केलेल्या म्हणण्यामध्ये दि.०४/०१/२०१६ च्या नोटीफिकेशअन्वये पीएच.डी. झालेवर वेतनवाढी देण्याची तरतूद नसल्याचे म्हटले आहे. सहाय्यक प्राध्यापक पदाला पीएच.डी. ही मुळ शैक्षणिक पात्रता (Basic Qualification) पीएच.डी. होते हे AICTE २००५ ने स्पष्ट होते असे म्हटले आहे.

दोन्ही पक्षकारांचे म्हणणे विचारात घेता, तक्रारदार यांची ज्या शाखेतून सेवा आहे व पद धारण केलेले आहे त्याच शाखेचे पीएच.डी. असल्याचे दिसून येते. सबब तक्रारदार यांनी सन २०१६ मध्ये पीएच.डी. धारण केलेल्या दिनांकापासून पीएच.डी. करिता देय असणा-या वेतनवाढ एआयसीटीई च्या दि.५ मार्च २०१० च्या अधिसुचनेनुसार लागू होतील असे समितीचे मत आहे.

करिता समिती खालील आदेश करीत आहे.

# आदेश

१. तक्रारदार यांना देण्यात आलेल्या वेतनवाढीच्या फरकाची पुर्वलक्षी प्रभावाने येणारी रक्कम संस्था व महाविद्यालयाने आदेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत त्यांना अदा करावी.

२. तक्रारदार यांच्या कॅस अंतर्गत प्रमोशनसाठी संस्थेने कॅस करिता योग्य कार्यवाही आदेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत करावी.

३. तक्रारदार यांनी पीएच.डी.धारण केले तारखेपासून त्यांना पीएच.डी. करिता देय असणा-या प्रोत्साहनपर वेतनवाढ फरकासह आदेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत अदा करावी.

दिनांक : 17 NOV 2021

सदस्य
(श्री. ए.ए. कुलकर्णी)

सदस्य
(श्री. आर.बी.तुपे)

सदस्य
(डॉ. व्ही. डी. नांदवडेकर)

सदस्य
(डॉ.एन.बी.गायकवाड)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन)

अध्यक्ष
(श्री.एस.पी.कुलकर्णी)

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.